वाचले:

१. पत्र क्र.साप्रवि/०४/कावि/९४४/२०२४, दिनांक ११/०६/२०२४.
२. पत्र क्र.साप्रवि/०४/कावि/९९३/२०२४, दिनांक २४/०६/२०२४.
३. पत्र क्र.साप्रवि/४/कावि/९२५/२०२४, दिनांक १०/०६/२०२४.
४. पत्र क्र.साप्रवि/०४/कावि/१०३९/२०२४, दिनांक ०९/०७/२०२४.
५. आदेश क्र.साप्रवि/४/कावि/७४९/२०२४, दिनांक १२/०३/२०२४.
६. पत्र क्र. क्र.साप्रवि/४/कावि/८५२/२०२४, दिनांक २८/०५/२०२४.
७. पत्र क्र.साप्रवि/०४/कावि/९३०/२०२४, दिनांक १०/०६/२०२४.
८. पत्र क्र.साप्रवि/०४/कावि/९८५/२०२४, दिनांक ०९/०७/२०२४.
९. सागर ओमप्रकाश गौरकार यांचा दिनांक २० जून, २०२४ रोजीचा ई-मेल
१०. हेमंत कलमसिंग चौरे यांचा दिनांक १५ जुलै, २०२४ रोजीचा ई-मेल.
११. हनुमान अशोक खोकले यांचा दिनांक १० जुलै, २०२४ रोजीचा ई-मेल.
१२. सचिन मधुकर मिसाळ यांचा दिनांक १० जुलै, २०२४ रोजीचा ई-मेल.
१३. मयुर आबासाहेब जाधव यांचा दिनांक २४ जुलै, २०२४ रोजीचे पत्र.
१४. सायली सतिश चनगुंडी यांचा दिनांक २९ जुलै, २०२४ रोजीचे पत्र.
१५. मा.आयुक्त यांचा दि. 30/08 /२०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८ सामान्य प्रशासन विभाग
क्र.सा.प्र.वि/४/कावि/११७९/२०२४
दिनांक - ०२/०९/२०२४

**विषय -लिपिक पदावरील निवड रद्द करणेबाबत.**

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील लिपिक अभिनामाची पदे जाहिरात क्र.१८४/२०२२ अन्वये नामनिर्देशनाव्दारे भरणेकामी दिनांक २०/०२/२०२४ रोजी अंतिम निवड व प्रतिक्षा यादी प्रसिद्ध करण्यात आलेली असून,खालील गुणवत्ताधारक उमेदवारांची निवड कर्मचारी निवड समितीने केलेली आहे.

| अ.क्र | उमेदवाराचे नाव | नेमणूक प्रवर्ग |
|---|---|---|
| १ | पूजा मनोहर नलगे | खुला (महिला) |
| २ | अमोल चंद्रकांत पुराणिक | खुला (प्रकल्पग्रस्त) |
| ३ | अरविंद दत्तू चव्हाण | ईडब्ल्युएस (माजी सैनिक) |
| ४ | विजय बळीराम डुबे | खुला (प्रकल्पग्रस्त) |
| ५ | पायल प्रदिप गुप्ता | इमाव (महिला) |
| ६ | सागर ओमप्रकाश गौरकार | विमाप्र सर्वसाधारण |
| ७ | हेमंत कलमसिंग चौरे | अनु.जमाती सर्वसाधारण |
| ८ | हनुमान अशोक खोकले | अनु.जमाती सर्वसाधारण |
| ९ | सचिन मधुकर मिसाळ | भज (क) प्रकल्पग्रस्त |
| १० | मयुर आबासाहेब जाधव | ईडब्ल्युएस सर्वसाधारण |
| ११ | सायली सतिश चनगुंडी | ईडब्ल्युएस (खेळाडू) |

उपरोक्त अ.क्र.१ ते ३ उमेदवारांना वाचले क्र.१ व २ अन्वये पुर्वचारित्र्य वर्तणूक पडताळणी व शारिरीक पात्रता तपासणी करुन घेणेकामी आवश्यक असलेला साक्षांकन नमूना फॉर्म भरुन घेणेकामी सामान्य प्रशासन विभागात उपस्थित रहाणेकामी कळविले होते. परंतु उपरोक्त नमूद अ.क्र.१ ते ३ वरील उमेदवार उपस्थित राहिले नाही. त्यानंतर वाचले क्र.२ चे पत्रान्वये सामान्य प्रशासन विभागात उपस्थित रहाणेकामी स्मरणपत्राद्वारे अंतिम मुदतवाढ/संधी देण्यात आली होती. तथापि, उपरोक्त उमेदवार सामान्य प्रशासन विभागात उपस्थित राहिलेले नाही अथवा लिपिक पदावर रुजू होणेकामी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार/ ई-मेल सामान्य प्रशासन विभागाशी केला नाही.

उपरोक्त अ.क्र. ४ वरील उमेदवार पुर्वचारित्र्य वर्तणूक पडताळणी व शारिरीक पात्रता तपासणी करुन घेणेकामी आवश्यक असलेले पत्र घेवून गेले आहेत. परंतु उपरोक्त नमुद अ.क्र.४ वरील उमेदवाराने शारिरीक पात्रता तपासणी अहवाल सामान्य प्रशासन विभागास सादर न केल्याने वाचले क्र.३ चे पत्रान्वये शारिरीक पात्रता तपासणी अहवाल सामान्य प्रशासन विभागात सादर करणेकामी स्मरणपत्राद्वारे अंतिम मुदतवाढ/संधी देण्यात आली होती. त्यानंतर वाचले क्र.४ चे पत्रान्वये त्यांचे विनंतीचे अनुषंगाने पुनश्च अंतिम मुदतवाढ/संधी देण्यात आली होती तथापि, उपरोक्त उमेदवाराने

शारिरीक पात्रता तपासणी अहवाल सामान्य प्रशासन विभागात सादर केला नाही अथवा लिपिक पदावर रुजू होणेकामी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार/ ई-मेल सामान्य प्रशासन विभागाशी केला नाही.

उपरोक्त अ.क्र.५ वरील उमेदवारास वाचले क्र.५ अन्वये लिपिक पदावरील नियुक्तीबाबतचे आदेश निर्गमित करण्यात आले होते. परंतु उपरोक्त नमुद अ.क्र.५ वरील उमेदवार सामान्य प्रशासन विभागात रुजू न झाल्याने वाचले क्र.६ ते ८ चे पत्रान्वये वेळोवेळी सामान्य प्रशासन विभागात रुजू होणेकामी स्मरणपत्राद्वारे अंतिम मुदतवाढ/संधी देण्यात आली होती. तथापि, उपरोक्त उमेदवार सामान्य प्रशासन विभागात रुजू झाले नाही अथवा लिपिक पदावर रुजू होणेकामी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार/ ई-मेल सामान्य प्रशासन विभागाशी केला नाही.

उपरोक्त अ.क्र. ६ ते ११ वरील उमेदवारांनी वाचले क्र. ९ ते १४ अन्वये लिपिक पदावर रुजू होणार नसलेबाबत कळविले आहे.

ज्या अर्थी उपरोक्त नमूद अ.क्र. १ ते ५ वरील उमेदवारांनी लिपिक पदावर रुजू होणेकामी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार/ ई-मेल सामान्य प्रशासन विभागाशी केला नाही, त्या अर्थी त्यांना नोकरीची आवश्यकता नाही. असे दिसून येते. तसेच अ.क्र.६ ते ११ वरील उमेदवारांनी ई-मेल/पत्राद्वारे कळविल्याने अ.क्र.१ ते ११ वरील उमेदवारांची लिपिक या पदावरील नियुक्ती रद्द करणे आवश्यक आहे.

सबब मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, या आदेशान्वये उपरोक्त तक्त्यातील नमूद अ.क्र. १ ते ११ वरील उमेदवारांची लिपिक पदाकरीता त्यांचे नावासमोर नमूद प्रवर्गातून करण्यात आलेली निवड रद्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

**प्रत-**

संबंधित उमेदवार.